परिपत्रक क्र. १

(१) **शैक्षणिक गुणवत्तावाढ वर्ग - इ.१० वी आणि**
(२) **शैक्षणिक गुणवत्तावाढ वर्ग - इ.९ वी :**

**रयत शिक्षण संस्था,सातारा.**
**कर्मवीर समाधी परिसर, सातारा.**
**माध्यमिक आस्थापना परीक्षा विभाग**
**परिपत्रक क्र. ०१ दिनांक ०१/०४/२०१९**

सर्व शाखाप्रमुख,
माध्यमिक विद्यालये, रयत शिक्षण संस्था,सातारा.
यांना ----------

१) **शैक्षणिक गुणवत्तावाढ वर्ग** (इ.१० **वी**) :

१. संस्थेतील हुषार विद्यार्थी **एस.एस.सी.** परीक्षेत गुणवत्तेत येण्याच्या दृष्टीने त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी गेल्या **अनेक** वर्षापासून संस्थेतर्फे विभागीय पातळीवर, विभागीय कार्यालयामार्फत हुशार विद्यार्थी गुणवत्तावाढ वर्ग घेतले जात **आहेत**. सदरचे वर्ग उपयुक्त ठरलेले **आहेत**. सन **२०१९** च्या उन्हाळी सुट्टीमध्ये याप्रमाणे विभागवार वर्ग **घेतले** जाणार **आहेत**.

२. हा वर्ग दर्जेदार होण्यासाठी प्रत्येक शाखाप्रमुखाने दक्ष **असावे**. या वर्गासाठी निवड **झालेले आपल्या** विद्यालयातील विद्यार्थी उन्हाळी वर्गाला उपस्थित राहतील, संपूर्ण वर्ग कालावधीत टिकून राहतील याची दक्षता **आपण** घ्यावी. तसेंच निवड **झालेल्या** विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना योग्य **मार्गदर्शन** करून या वर्गातून हुशार विद्यार्थ्यांना **जास्तीत जास्त** फायदा होण्याच्या दृष्टीने शाखाप्रमुखांना जे जे करणे शक्य **आहे** ते ते त्यांनी करून संस्थेची ही योजना यशस्वी होईल या दृष्टीने प्रयत्न करावेत.

३. तेंव्हा या गुणवत्तावाढ वर्गासाठी **आपल्या** विद्यालयातील हुशार विद्यार्थ्यांची माहिती दि. **०८/४/२०१९** पर्यंत **आपल्या** विभागीय कार्यालयाकडे पोहोच होईल **अशा** रीतीने पाठवावी.

४. सदर वर्गाच्या नियोजन व **कार्यवाहीबाबत आपल्या** विभागीय कार्यालयामार्फत परिपत्रकाने सूचना दिल्या जातील. त्याप्रमाणे **आपण** कार्यवाही करावयाची **आहे**.

५. सन **२०१७-२०१८** मध्ये **इ.८** वीच्या वार्षिक परीक्षेत व सन **२०१८-२०१९** मध्ये **इ.९** वीच्या पहिल्या सत्र परीक्षेत **८० टक्केपेक्षा अधिक** गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांची माहिती खालील नमुन्यात **आपल्या** विभागीय कार्यालयाकडे पाठवावी.

| अ. नं. | विद्यार्थ्यांचे संपूर्ण नाव | सन **२०१७-२०१८** मधील **इ.८** वी वार्षिक परीक्षेत मिळालेले शे.गुण (प्रत्येक विषयाचे श्रेणी पत्रक) | सन **२०१८-२०१९** मध्ये **इ.९** वीचे पहिल्या सत्र परीक्षेत मिळालेले शे.गुण | रकाना ३ व ४ मधील शेकडा गुणांची बेरीज | सरासरी शेकडा गुण | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

२) **शैक्षणिक गुणवत्तावाढ वर्ग** (इ.९ वी) :

१. **इ.१०** प्रमाणेच **इ.९** वीतील संस्थेतील हुशार विद्यार्थ्यांसाठी गेल्या **अनेक** वर्षापासून संस्थेच्या सर्व विभागात संस्थेतर्फे विभागीय पातळीवर, विभागीय कार्यालयामार्फत गुणवत्तावाढ वर्ग **चालविले जात असून**, यावर्षीही **असे** वर्ग संस्थेच्या सर्व विभागात विभागीय कार्यालयामार्फत घेण्यात येणार **आहेत**. तेंव्हा **आपल्या** विद्यालयातील हुशार विद्यार्थ्यांची माहिती दि. **०८/४/२०१९** पर्यंत **आपल्या** विभागीय कार्यालयाकडे पोहोच होईल **अशा** रीतीने पाठवावी.

२. सन **२०१७-२०१८** मध्ये **इ.७** वीच्या वार्षिक परीक्षेत व सन **२०१८-२०१९** मध्ये **इ.८** वीच्या पहिल्या सत्र परीक्षेत **८० टक्केपेक्षा अधिक** गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांची माहिती खालील नमुन्यात **आपल्या** विभागीय कार्यालयाकडे पाठवावी.

| अ. नं. | विद्यार्थ्यांचे संपूर्ण नाव | सन **२०१७-२०१८** मधील **इ.७** वी वार्षिक परीक्षेत मिळालेले शे.गुण (प्रत्येक विषयाचे श्रेणी पत्रक) | सन **२०१८-२०१९** मध्ये **इ.८** वीचे पहिल्या सत्र परीक्षेत मिळालेले शे.गुण | रकाना ३ व ४ मधील शेकडा गुणांची बेरीज | सरासरी शेकडा गुण | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

३. गुणवत्तावाढ वर्गासाठी निवडलेल्या विद्यार्थ्यांची निवास, **भोजनाची** व्यवस्था केंद्राचे ठिकाणी केली जाईल. **भोजन** व स्टेशनरी याचा खर्च विद्यार्थ्याने स्वत: करावयाचा **आहे**. याबाबत विभागीय कार्यालयामार्फत कळविण्यात येईल. विद्यार्थ्यांना केंद्रप्रमुखाच्या **आज्ञेत** वागावे लागेल. ज्या विद्यार्थ्यांचे वर्तन **चांगले आहे** व **जे** या योजनेचा फायदा घेऊ **इच्छितात** **अशा** विद्यार्थ्यांची माहिती **आपल्या** विभागीय कार्यालयास दि. **०८/४/२०१९** पर्यंत मिळेल **अशा बेताने** पाठवावी. सदर माहिती वेळेत न पाठविली गेल्यास संबंधित हुशार विद्यार्थ्यांस प्रवेश देणे कठीण होणार **आहे** याची नोंद घ्यावी.

४. सदरचे परिपत्रक **http://www.rayatshikshan.edu** या संस्था वेबसाईटवर माहितीसाठी व **आपण आपल्या** शाखेत करावयाच्या कार्यवाहीसाठी उपलब्ध **आहे**.

कळावे.

(श्री.विलास महाडीक)
सहसचिव(माध्य.),
रयत शिक्षण संस्था, सातारा.

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी :

(१) सर्व **इन्स्पेक्टर्स**, रयत शिक्षण संस्था, सातारा.

(२) **ऑडिटर** रयत शिक्षण संस्था, सातारा.